2021-22 MRS

(20)

VOLUME - VIII : ISSUE-I (February-2022)
ISSN :2455-4375
IMPACT FACTOR : 5.473 (SJIF)

330




**UPA National Peer-Reviewed - Refereed & Indexed Journal**

CHIEF EDITOR
Dr. Anil Dodewar
EDITOR
Dr. Ghizala. R. Hashmi
Dr. Siddharth Meshram
Prof. Mohammad Asrar
ASSOCIATE EDITOR
Dr. Sharad Meshram
Dr. Pranaya Patil

PUBLISHED BY:
UPA GROUP PUBLICATION
In Association With
Seth Kesarimal Porwal College of Arts and Science and Commerce, Kamptee

CORPORATE OFFICE:
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

PUBLICATION :
The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.

© All Rights Reserved © The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.

**For downloading the Issue, Click the link given below**
https://upa.org.in/special-issue.php?id=MTc=
Visit : www.upa.org.in

**Share your valuable feedback at**
upanagpur@gmail.com
upajournal@gmail.com

## UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

UPA

Published By
UPA Group Publication

In Association With



SETH KESARIMAL PORWAL COLLEGE OF ARTS AND SCIENCE AND COMMERCE
KAMPTEE (NAGPUR)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | **डॉ. तनुजा नाफडे**<br>आर.एस.मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर. | गुरुमोल मंत्र जाणावा! | 31-35 | PDF | |
| 8 | **प्रा.दिपकराव बाबुराव देवरे**<br>पंकज कला व विज्ञान महाविद्यालय चोपडा जि. जळगांव<br>**प्रा. डॉ. एस. पी. ढाके**<br>कै. म.दि.सिसोदे उर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय नरडाणा ता.शिंदखेडा जि. धुळे | दहशतवाद रोखण्यासाठी भारताने केलेले कायदे व सुरक्षा | 36-38 | PDF | |
| 9 | **प्रा.डॉ. धनंजय गभणे**<br>समर्थ महाविद्यालय, लाखनी, त. लाखनी, जि. भंडारा | महाराष्ट्रातील ग्रामिण भागातील महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासातील योगदान | 39-42 | PDF | |
| 10 | **प्रा.डॉ.मेघराज रा. शिंदे**<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | आदिवासी विकासाचे दृष्टिकोन | 43-46 | PDF | |
| 11 | **प्रा. सौ. वैशाली रा. मोरे**<br>श्रीमंती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महा. मेहकर जि.बुलडाणा | समतोल आहाराचे महत्व व आहारीय समस्यांचे निराकरण | 47-50 | PDF | |
| 12 | **प्रा. डॉ. सविता माधवराव पवार**<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय | तहान कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास | 51-54 | PDF | |
| 13 | **प्रा. डॉ. वैशाली गभने (सुरकार)**<br>लक्ष्मीबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मांगली (खापा) | झाडीबोलीतील उखाण्यातील कृषिदर्शन | 55-58 | PDF | |
| **Section:- Hindi** | | | | | |
| 1 | **डॉ. मिनाक्षी वाणी**<br>एल.ए.डी. अन्डें श्रीमती आर.पी हिला महाविद्यालय शंकरनगर नागपुर | साठोत्तरी हिंदी ग़ज़लों में सौंदर्य | 1-5 | PDF | |
| 2 | **डॉ इफ्तेखार आर हुसेन**<br>एस. के. पोरवाल कॉलेज ऑफ आर्ट्स एंड साइंस एंड कॉमर्स, कामठी | उभरते बाज़ारों पर ई-कॉमर्स का प्रभाव | 6-11 | PDF | |
| 3 | **डॉ. सी. पी. गुप्ता**<br>स्वामी विवेकानंद शासकीय स्नातकोत्तर महाविद्यालय, हरदा | मुंशी प्रेमचंद की कहानियों में राष्ट्रीय चेतना | 12-16 | PDF | |
| 4 | **Dr. Azhar Abrar Ahmad**<br>Seth Kesarimal Porwal College, Kamptee | Vidarbha Ke Jadeed Urdu Shora e Karam | 1-5 | PDF | |
| 5 | **Dr. Mubeen Nazeer**<br>MGV'S Arts, Commerce and Science College Malegaon City | Ishq e Nabi ki Meeraj- Fi Shaan e Habib | 1-6 | PDF | |

IMPACT FACTOR
5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Volume -8 : Issue-1 (February-2022)

ISSN
2455-4375

# आदिवासी विकासाचे दृष्टिकोन

प्रा.डॉ.मेघराज रा.शिंदे
श्रीमती सिंधुताई जाधव
कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर
मो.9890193315
मेल : meghraj.shinde1234@gmail.com

---

**आदिवासी विकसाचा अर्थ** (Meaning of Tribal Development) : आदिवासी समाज मागासलेला असल्यामुळे आदिवासींचा विकास झाला नाही. आदिवासी विकास नविन संकल्पना नाही. आदिवासींमध्ये अनेक समस्या आहेत. त्यांच्या समस्या दूर करणे गरजेचे आहे. आदिवासींच्या समस्येमुळे त्यांच्या अनेक जमाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक जमातींची लोकसंख्या कमी झालेली आहे. हे फक्त भारतातच घडत नाही तर अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया देशांमध्ये आदिवासीची समस्या वाढत चालली आहे. आधुनिक समाजाच्या संपर्कामुळे त्यांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांचे धर्मांतर वाढत चालले आहे. त्यांची संस्कृती बदलत चालली आहे. त्यांच्या समस्या कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आदिवासींचा विकास करायचा असेल तर काही प्रयत्न करणे गरजेचे आहे. आदिवासीमध्ये विकास घडवून आणण्यासाठी पृथकता, सात्मीकरण या धोरणाचा अवलंब केला आहे. या दोन निती किंवा धोरणाचा फारसा प्रभाव पडला नाही. म्हणून नविन धोरण निर्माण करण्यात आले. या धोरणाला एकता धोरण म्हणून ओळखले जाते. विदेशी शासक आणि त्यांच्या विचारातून पृथकतेची निती समोर आली. असा दावा करण्यात आला की, आदिवासी लोक हे अलग ठिकाणी त्यांच्या आहे त्या ठिकाणी सुरक्षित राहतील. त्या ठिकाणी ते आपली संस्कृती टिकवून ठेवतील. परंतु या धोरणावर टिका करण्यात आली. टिकाकारांच्या मते, अलग राहून आदिवासींचा विकास होणार नाही. सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक सुधारणावादी, लोककल्याणकारी यांना आदिवासीचे सात्मीकरण व्हावे असे वाटते. परंतु सात्मीकरणामुळे आदिवासींचे अस्तित्त्व, वेगळेपण नष्ट होईल. या पद्धतीची टिका या सात्मीकरणाच्या पद्धतीवर झाली. एकता नितीला स्वातंत्र्यानंतर प्राधान्य देण्यात आले.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) आदिवासी विकासाचा अर्थ स्पष्ट् करणे.
2) आदिवासी विकासाचे दृष्टिकोन स्पष्ट् करणे.
3) आदिवासी विकास दृष्टिकोनाची चिकित्सा करणे.
4) आदिवासी विकास झाला का ते अभ्यासणे.

**संशोधनाची पद्धत :**

प्रस्तुत संशोधनात मी दुय्यम स्त्रोताचा आधार घेतला आहे. वेगवेगळे ग्रंथ, पत्रिका, वर्तमानपत्रे यांचा आधार घेऊन विश्लेषण केले आहे.

**संशोधनाचा आराखडा :**

संशोधन करीत असताना मी संशोधनाचा विषय लक्षात घेता वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे तथ्याचे विश्लेषण केले आहे.

**आदिवासी विकासाचे दृष्टीकोन** (Tribal Development Approaches) :-

आदिवासी विकासाचे तीन दृष्टीकोन आहेत. आदिवासी समस्या दूर करण्यासाठी हे तीन दृष्टीकोन महत्वाचे आहेत. असे अभ्यासकांनी म्हटले आहे. विकासाचे दृष्टीकोन खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) पृथकता (Isolation)** : आदिवासींच्या अनेक समस्या गैर आदिवासी लोकांमुळे, बाह्य घटकांमुळे निर्माण झाल्या आहेत. आदिवासीच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना बाहय घटकापासून पृथक केले पाहिजे. त्यांना सभ्य समाजापासून दूर ठेवले पाहिजे, असा विचार मांडला गेला. या विचाराचे समर्थन डॉ. इल्विन यांनी केले परंतु नंतर त्यांच्या लक्षात आले की, सभ्य समाजामुळे आदिवासीच्या जीवनावर परिणाम झाला आहे. व्यापारी, सावकार, अधिकारी लोकांनी आदिवासीचे शोषण केले आहे. आदिवासींना पृथक ठेवले पाहिजे असे विचार त्यांनी १९४२ मध्ये प्रकाशीत झालेल्या आपल्या Loss of Nere या ग्रंथात केले आहे. आदिवासी करीता वेगळा विभाग करण्यात यावा, त्यामध्ये कुणीही हस्तक्षेप करू नये, असे डॉ. इल्विन यांनी म्हटले आहे. या योजनेला त्यांनी राष्ट्रीय उद्यान असे म्हटले आहे. यामध्ये आदिवासी आपले जीवन चांगल्या पद्धतीने जगतील. आदिवासींना समाजापासून दूर ठेवायचे त्यांच्यावर कोणताही प्रभाव पडू द्यायचा नाही. त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरा, भाषा, कला, साहित्य, संस्कृती इ. ची जोपासना करायची, त्यांच्यामध्ये बदल घडवून आणायचा, या पद्धतीची कल्पना डॉ इल्बिन यांनी मांडली. डॉ. इल्विन यांच्या धोरणाला आदिवासीचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी विरोध केला. ठक्कर बाप्पा या संशोधकाने या धोरणाला विरोध केला हा सिद्धांत राष्ट्रीय एकात्मतच्या विरोधी आहे, धोकादायक आहे असे त्यांनी म्हटले आहे. आदिवासींची सुरक्षितता ही पृथकतेत नसून एकतेत आहे असे म्हटले आहे. आदिवासींना पृथक ठेवून त्यांचा विकास होईल असे मानने चुकीचे आहे. पृथक ठेवल्यामुळे त्यांचा व्यापक प्रमाणात विकास होणार नाही. ते राष्ट्रीय प्रवाहापासून दूर राहतील. राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याच्या दृष्टीने सांस्कृतीक देवाण-घेवाण गरजेची असते. आदिवासींना अलग ठेवणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने चुकीचे आहे. पृथक ठेवून विकास करणे योग्य नाही. त्यामुळे त्यांची समस्या दूर होणार नाही.

**२) सात्मीकरण (Assimilation):-** आदिवासीचे विलिनीकरण घडवून आणावे त्यांना अलग ठेवू नये, त्यांना भारतीय समाजात एकरूप करून घ्यावे. त्यामुळे त्यांच्या वेगळ्या समस्या राहणार नाहीत या विचाराचे समर्थन ठक्कर बाप्पा. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी केले आहे. पृथकतेमुळे त्यांचे प्रश्न वाढत जातील. पृथकतेमुळे ते दुर्लक्षीत राहतील. ही उपाययोजना आदिवासी विरोधी, देशविरोधी आहे. देशातील लोकांना सर्व हक्क मिळावेत. हे सर्व हक्क आदिवासींना मिळणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने सात्मीकरणाचा मार्ग योग्य ठरतो भारतीय समाजाशी आदिवासी लोक एकरूप झाल्यास त्यांच्या समस्या दूर होतील असे मत डॉ. जो. एस. धुर्य यांनी मांडले आहे. आदिवासीचे जीवन भारतीय लोकांच्या जीवन पद्धतीशी मिळते जुळते आहे. त्यामुळे त्यांचे सात्मीकरण सहज घडून येईल त्यासाठी त्यांना भारतीय समाजात एकरूप करणे गरजेचे आहे, असे विचारवंताना वाटते विलीनीकरण करत असताना विलीनीकरण कसे करायचे यासंबंधी स्पष्ट माहिती नाही. त्यांचे विलीनीकरण केल्यानंतर आदिवासीचा स्वतंत्र दर्जा राहणार नाही. भारतात जातीव्यवस्था आहे. त्यामुळे त्यांचा कोणत्या जातीत समावेश करावा हा प्रश्न

नव्याने निर्माण होईल या प्रकारची टिका सात्मीकरणाच्या प्रक्रियेवर केली आहे. या प्रक्रियेतून आदिवासींचे वेगळेपण राहणार नाही.

३) एकता (Integration) :- आदिवासींना पृथक करणे किंवा त्यांचे सात्मीकरण करणे, हे दोन्ही मार्ग परस्पर विरोधी आहेत. पृथकतेमुळे आदिवासी संस्कृतीचे जतन होईल, परंतु ते राष्ट्रीय प्रवाहापासून दूर जातील सात्मीकरणामुळे .आदिवासी वेगळे राहणार नाहीत. परंतु त्यांची संस्कृती नष्ट होईल हे दोन्हीही मार्ग योग्य नाहीत. हे लक्षात घेऊन **डॉ. हट्टन** यांनी या मार्गाचा पुरस्कार केला आहे. हा मार्ग पृथकता आणि सात्मीकरण यांचा सुवर्णमध्य आहे. भारतीय जीवनाशी आदिवासोची एकता निर्माण करीत असताना त्यांच्या संस्कृतीचे जतन करताना त्यांना सुरक्षितता दिली पाहिजे. एकतेच्या मार्गाने आदिवासीच्या समस्या निर्मूलन करता येतात. या माध्यमातून त्यांचा विकास करता येतो. या मार्गाचा पुरस्कार पं. जवाहरलाल नेहरू यांनी केला आहे. भारतात विविधता आहे. भारतात अनेक भाषा, धर्म, पंथ, आचार विचारांचे लोक राहतात. भारतात विविधतेत एकता आहे. असे असले तरी त्यांच्यामध्ये एकात्मीकरण झाले नाही. प्रगत देशांमध्य वेगवेगळया जाती धर्माचे, संस्कृतीचे लोक राहतात. त्यांच्यामध्ये एकता निर्माण होऊ शकते. अशा प्रकारची एकता भारतात निर्माण करणे गरजेचे आहे.

**नेहरूंचे आदिवासी पंचशील** :- नेहरूच्या मते, आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहात सहभागी करून घेतले पाहीजे त्याकरीता त्यांना मदत केली पाहिजे. मदत करणे हे आपले कर्तव्य आहे असे नेहरुंनी म्हटले होते. नेहरूनी इल्वीन यांच्या फिलॉसॉफी ऑफ नेफा या ग्रंथाला प्रस्तावना दिली. या प्रस्तावनेत त्यांनी पंचशील सिद्धांत मांडला. या पंचशील सिद्धांतामध्ये आदिवासोच्या संदर्भात त्यांनी पाच तत्वे सांगितली त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

१) आदिवासींनी बुद्धीमत्तेचा विकास करावा लोकांनी त्यांना त्यांच्या पारंपारिक कला संस्कृतीस प्रोत्साहन द्यावे

२) आदिवासींच्या भूमी, कला विषयक अधिकारांचा आदर करावा.

३) आदिवासींना प्रशासन आणि विकास कार्यासाठी प्रशिक्षीत केले पाहीजे.

४) आदिवासीच्या सामाजिक, सांस्कृतीक संस्थांचा विकास करावा.

५) आदिवासीच्या योजना राबविताना त्यांच्या मानवी वैशिष्टयाचा विचार करावा.

या पद्धतीने एकतेचा दृष्टीकोन आदिवासीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या दृष्टीने त्यांची कला, साहित्य, संस्कृती जतन होऊ शकते. त्यांना संरक्षण होऊ शकते. या संदर्भात बोलताना डॉ. हट्टन म्हणतात की, आदिवासीचा विकास संरक्षणाच्या छायेत होणार आहे. त्यांना संरक्षण दिले तर ते आपल्या पायावर उभे राहतील. स्वयंशासन करू शकतील आणि भारतीय जीवन संपन्न करण्यासाठी आपल्या बुद्धी आणि शक्तीवर हातभार लावतील. भारतातील आदिवासींचा विकास करण्याच्या दृष्टीने हा विचार अधिक उपयुक्त आहे. याच दृष्टीकोनातून आदिवासीचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावे अशी जबाबदारी शासनावर घटनेने दिली आहे. त्यासाठी अनेक योजना तयार केल्या आहेत. योजनाची अंमलबजावणी केली आहे.

एकतेचा दृष्टीकोन आदिवासींच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या दृष्टीकोनातून आदिवासी सोबत संवाद साधला जातो आदिवासी समाज नितीमूल्यावर चालतो त्यांच्याकडे सामाजिक मूल्य मोठया प्रमाणात आहेत. असे नेहरुच्या विचारातून लक्षात येते आदिवासींच्या सांस्कृतीक एकतेतून भारतीय समाजात एकता निर्माण व्हावी असा या

नितीचा उद्देश आहे. नेहरूच्या पंचशीलामध्ये त्यांच्या एकतेचे तत्त्व अंतर्भूत आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात असे आढळून येते की, एकतेच्या नितीचे पालन केले जात नाही. नितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आदिवासींची पारंपारीक कला संस्कृतीचे रक्षण करून त्यास प्रोत्साहन दिले पाहीजे आणि आपण परंपरागत संस्थांच्या माध्यमातून कार्य करायला पाहिजे. परंतु असे घडताना दिसत नाही. अनेक परंपरागत संस्था नामशेष झाल्या आहेत. किंवा दुर्लक्षित झाल्या आहेत त्यामुळे त्यांची संस्कृती लोप पावत चालली आहे. आदिवासीचे युवागृह नामशेष होत चालले आहे.

परिवर्तनाच्या नावाखाली आदिवासी संस्कृती नष्ट होत चालली आहे. आदिवासीच्या बाबतीत परिवर्तनाच्या योजना, आदिवासी विकासाच्या योजना. त्यांच्या संस्कृतीवर आघात करीत आहेत. त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरा, कला, साहित्य, संस्कृती यांचे जतन करणे आवश्यक आहे. कारण या गोष्टी त्यांच्या जीवनाचा भाग आहेत. डॉ. इल्विन यांनी त्यांच्या कला, संस्कृतीचा अभ्यास केला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, आदिवासी कला आणि संस्कृतीचे जतन केले पाहिजे आदिवासी कलेचा ऱ्हास झाल्यास आदिवासी संस्कृतीचा ऱ्हास होईल्. त्यामुळे आदिवासी जीवन सुखी होईल त्यांच्या जीवनाचा समतोल नष्ट होईल. परिवर्तनाच्या प्रक्रियेचा फार मोठा परिणाम आदिवासी जीवनावर होईल. नेहरूच्या पंचशील तत्त्वाचा विचार करताना आदिवासीच्या जीवनाला प्राधान्य दिले पाहिजे. त्यांच्या संस्कृतीचे जतन केले पाहिजे. आदिवासींच्या बाबतीत एकतेची निती त्यांच्या विकासाची निती ठरू शकते. ही निती सर्व नितीमध्ये आदर्श आहे. या नितीची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली नाही. त्यामुळे आदिवासीची उद्दीष्ट पुर्ण झाली नाही. प्रशासकीय अधिकारी या नितीच्या अपयशाला जबाबदार आहेत. आदिवासीची एकता निती महत्त्वाची आहे. या नितीमधील अडथळे लक्षात घेणे गरजेचे आहे. या संदर्भात विशिष्ट उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. याच धोरणाचा अवलंब करून आदिवासींचा विकास केला पाहीजे.

**निष्कर्ष :**

1) आदिवासी विकास झाला नाही.
2) योजना योग्य् पद्धतीने राबविल्या नाहीत.
3) आदिवासींना विकासात सहभागी करुन घेतले नाही.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

1) डॉ.प्रदिप आगलावे – सामाजिक मानवशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2) डॉ.ए.डी.चव्हाण, रा.ज.लोटे - सामाजिक मानवशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
3) डॉ.बी.के.किर्दक, डॉ.दया.पांडे - सामाजिक मानवशास्त्र, अथर्व प्रकाशन, जळगांव.
4) डॉ.दिनकर उंबरकर - सामाजिक मानवशास्त्र, साधना प्रकाशन, परभणी.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana